SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : १८२/२०२५ दिनांक : २७-०९-२०२५

विषय :- संलग्निकरणाबाबत..

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेल्या महाविद्यालयातील अभ्यासक्रम/ विषयाच्या विद्याविषयक लेखापरीक्षणाच्या माध्यमातुन महाविद्यालयांचे संलग्निकरण वाढीसंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व महाविद्यालयाचा प्राप्त अनुपालन अहवाल व दस्ताऐवज अधिष्ठाता मंडळाच्या दि.२५/९/२०२५ रोजीच्या सभेत विषय क्र. १०६ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आला होता.त्यावर विचारविनीमय करुन अधिष्ठाता मंडळाने प्रवेशित विद्यार्थ्यांचे हिताचा विचार करता सत्र २०२५-२६ करिता शेवटची संधी देण्यात यावी असे ठरले. त्याअनुषंगाने समितीचा अहवाल व अधिष्ठाता मंडळाची शिफारस विद्या परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १२(७) अंतर्गत मा.कुलगुरुंनी स्विकृत केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयास, स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रम/ विषय/अतिरीक्त तुकडीस, स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०८ ,११४ व ११५ मध्ये दर्शविलेल्या तरतुदीचे व शिखर परिषदेच्या मान्यतेच्या अधिन राहुन संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

TABLE

Sr No.	Name of the college	Subject/Courses	Recommendation
1.	2.	3.	4.
1.	Shahu Maharaj College of Education, Malvihir, Buldhana. (345)	B.Ed.	For the Session 2025-26

स्वा/-
प्र.कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ